शेतीकडे पुनरागमन

एकत्रित शेती आणि तंत्रज्ञानाचा स्वीकार

Vijaya Hosamani and Mala Patil

छंद म्हणून सुरुवात करून यशस्वी उद्योजक शेतकरी होईपर्यंत, सौ. इंदुमती यांचा प्रवास खूप प्रेरणादायी आहे. वाढत्या वयाची मर्यादा न जुमानता, त्यांनी विविध शेती घटकांचा समावेश, सेंद्रिय पद्धतीचा अवलंब आणि कष्ट कमी करणाऱ्या यंत्रसामग्रीचा उपयोग करून शेतीतून उत्पन्न वाढवता येते हे सिद्ध केले आहे. शेतीबाबत त्यांचा उत्साह हे दर्शवतो की नवीन कौशल्ये शिकणे व शेतीत सहभागी होणे याचे वयाशी काहीही घेणेदेणे नाही.



शेतीतील जैविक कचरा परत मातीमध्ये मिसळून पुनर्वापर केला जातो

भारतातील ग्रामीण समाजासाठी शेती हा मुख्य व्यवसाय असून, ती अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी आहे. मात्र, कमी उत्पन्न, हवामानातील बदल व नैसर्गिक आपत्तीमुळे आजची तरुण पिढी शेतीकडे वळत नाही. आधुनिक जीवनशैलीची अपेक्षा असल्यामुळे अनेकजण शहरांकडे स्थलांतर करत आहेत. अशा परिस्थितीत, ५५ व्या वर्षी शहरातून गावाकडे येऊन शेती करणाऱ्या महिलांचे उदाहरण दुर्मिळच.

ही कथा आहे सौ. इंदुमती पी. चन्नाळ यांची, ज्या बेळगाव जिल्ह्यातील गोकाक तालुक्यातील धवळेश्वर येथील रहिवासी आहेत. इंदुमतीबाई फक्त सातवी पर्यंत शिक्षण घेऊ शकल्या, परंतु घरच्या जबाबदाऱ्या पूर्ण केल्यानंतर त्यांनी काहीतरी वेगळं करण्याचा निर्धार केला.

२०००-२००१ साली त्यांनी २ एकर जमिनीत एकत्रित सेंद्रिय शेती सुरू केली. त्यांनी कृषि-उद्यानशेती-वनशेती पद्धतीचा अवलंब केला आहे. ३० गुंठ्यात हळद, त्याच्याशेजारी कंगणी, भाजीपाला व चाऱ्यासाठी मका घेतला जातो. हळद व कंगणी काढणीनंतर पारंपरिक गहू घेतला जातो. कंगणी विक्री करन्या एवजी घरच्या खाण्यासाठी राखून ठेवली जाते. शेताच्या सीमेवर त्यांनी सुमारे ३०० सागवानी झाडे आणि मधे मधे नारळाची झाडे लावली आहेत.

त्यांच्या शेतातून आरोग्यदायी आणि शुद्ध सेंद्रिय उत्पादने मिळतात, जसे की आंबा, केळी, नारळ, चिंच, हळद आणि हळद पूड. हळद पिकवून दरवर्षी सुमारे ₹ ६५,०००/- निव्वळ उत्पन्न मिळते. हळद घरच्या गिरणीत दळून शुद्ध हळद पूड तयार केली जाते. हळद व हळद पूड दोन्हीही सांगलीच्या बाजारात कमिशन एजन्सीमार्फत विकल्या जातात.

शेतीतील जैविक कचरा परत मातीमध्ये मिसळून पुनर्वापर केला जातो

शेताच्या सीमेवर लावलेली सागवानी झाडे भविष्यात सुमारे एक कोटी रुपयांचे उत्पन्न देतील, असा अंदाज आहे. नारळ स्थानिक बाजारात व जवळच्या शहरातील हॉटेलांना विकले जातात. नारळ विकून त्यांनी ₹४०,०००/- उत्पन्न मिळवले आहे. याशिवाय, शेतात सुमारे २०० केळीची झाडे लावली असून, त्यातून दरवर्षी सुमारे ₹१ लाख इतके उत्पन्न मिळते. हेच नव्हे तर त्यांनी चिकु, सीताफळ, रत्ना गिरी येथून आणलेली विविध प्रकारची आंब्याची झाडे देखील लावली आहेत. आंब्याच्या झाडांना फळधारणा सुरू झाली आहे. चिंच, लिंबू, चेरी,

तक्ता १: पीक पद्धती, खर्च आणि निव्वळ नफा.

पिकाचे नाव	खर्च (₹)	नफा (₹)	उपयोग	विक्रीचा प्रकार / ग्राहक
हळद	३५,००० /-	६५,००० /-	घरगुती वापर व विक्री	कमिशन एजन्सीद्वारे व मित्रपरिवागत थेट ग्राहकांना
नवाणे (Foxtail Millet)	—	—	फक्त घरगुती वापर	—
सागवान (Teak)	५,००० /-	अंदाजे एक कोटी (भविष्यात)	भविष्यातील आर्थिक लाभ	—
चिंच	१०० /-	५,००० /-	घरगुती वापर व विक्री	स्थानिक पातळीवर विक्री
नारळ	२००० /-	४०,०००/-	घरगुती वापर व विक्री	जवळच्या शहरातील हॉटेल्सना विक्री
केळी	१०,००० /-	१,००,००० /-	-do-	जवळच्या शहरगच्या बाजारात विक्री
आंबा व इतर फळझाडे	२,००० /-	२०,००० /-	बहुतांश फळे घरगुती वापरासाठी	स्थानिक पातळीवर विक्री (जेवढे जास्तीचे उत्पादन होते ते)
एकूण	**५४,१०० /-**	**२,३०,००० /-**		

रामफळ यांचीही लागवड केली असून, या झाडांची रोपे कृषी विद्यापीठ, धारवाड येथून आणली आहेत. या सर्व फळझाडांपासून मिळणारे उत्पन्न मुख्यतः घरगुती वापरासाठीच उपयोगात आणले जाते.

सेंद्रिय शेतीला हातभार लावण्यासाठी शेतात चार एचएफ गायींचे पालन केले जात आहे. या गायी दररोज मिळून सुमारे पाच लिटर दूध देतात, जे धवळेश्वर येथील स्थानिक डेअरीला दर लिटर ₹५० दराने विकले जाते.

तक्ता २: व्यवसाय आणि यंत्र खर्च.

घटकाचे नाव		खर्च (रु.)
दुग्धव्यवसाय (गायींचे पालन)		₹२५,००० /-
व्हर्मी कंपोस्ट		₹१०० /-
बायो-डायजेस्टर		₹५,००० /-
ठिबक सिंचन प्रणाली		₹२०,००० /-
कंपोस्ट निर्मिती		₹५०० /-
यंत्रसामग्री व श्रमकठीणता कमी करणारी साधने:	- नारळ सोलायचे यंत्र (Sheller)	₹१५०० /-
	- नारळाच्या झाडावर चढवणारे साधन (Climber)	₹४,५०० /-
	- आंबा तोडायचं साधन (Harvester)	₹३०० /-
	- गहू दळायची गिरणी (Mill)	₹१०,००० /-
एकूण खर्च		**₹६६,८०० /-**

शेतीसाठी आवश्यक असलेली व्हर्मी कंपोस्ट, पंचगव्य, जीवामृत, बायो-डायजेस्टर आणि वेगवेगळ्या झाडांच्या पानांपासून तयार केलेले काढे (कषाय) शेतातच तयार केले जातात. हे सर्व खते, वाढ प्रवर्तक आणि नैसर्गिक कीडनाशक म्हणून वापरले जातात.

कामाचा त्रास कमी करणारी व यांत्रिक साधनेही वापरली जात आहेत, त्यात गहू दळायची गिरणी, नारळ सोलायचं यंत्र, नारळ चढवणारी उपकरणं, आंबा तोडणारे साधन यांचा समावेश आहे. तसेच, शेतावर ठिबक सिंचन प्रणालीचा वापर केला जात आहे.

एकूणच, त्या दरवर्षी सुमारे ₹२.५ लाख उत्पन्न मिळवतात. त्या वर्षभर स्वतःसाठी काही प्रमाणात भाज्या पिकवतात, त्यामुळे भाजीपाल्यावरील खर्च बऱ्यापैकी वाचतो. ज्याप्रमाणे पैसा मिळवणे हे उत्पन्न आहे, त्याचप्रमाणे पैसा वाचवणेही उत्पन्नच आहे.

त्यांची शेतीसाठीची निष्ठा, जिद्द आणि यश यांची दखल घेत, युएएस धारवाड यांनी २००९-१० मध्ये त्यांना 'सर्वोत्तम महिला शेतकरी पुरस्कार' देऊन गौरवले. त्याचबरोबर, उद्यानविद्या विद्यापीठ, बागलकोट यांच्या 'शेतकरी ते शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमासाठी' त्यांची संसाधन व्यक्ती म्हणून निवड करण्यात आली. अनेक लोक त्यांच्या शेताला भेट देऊन त्यांच्या उद्यमशीलतेचे प्रत्यक्ष दर्शन घेतात आणि त्यांच्या वयातही असलेल्या उत्साह आणि समर्पणाची भरभरून प्रशंसा करतात.

शेती त्यांच्याच हाताला साथ देते, जे तिचा हात धरतात. शेतीसाठी वयाची अट नाही. केवळ निश्चय, मेहनत आणि मनापासूनची आवड लागते — आणि ह्या साऱ्या गोष्टी सौ. चन्नळ यांच्या कार्यातून दिसून येतात. त्यांनी पिक विविधता, एकात्मिक शेती पद्धती आणि सेंद्रिय शेती यांचा अवलंब करून केवळ उच्च दर्जाचे उत्पादन मिळवले नाही, तर खते व कीडनियंत्रणावर होणारा खर्चही कमी केला, त्यामुळे शेती फायदेशीर आणि उत्पन्नदायक बनली आहे. त्या नव्या आणि जुन्या पिढींसाठीही एक प्रेरणास्त्रोत ठरल्या आहेत.

Vijaya Hosamani
Asst. Prof. of Agril. Extension. Dept. of SAS.
College of Horticulture, Bagalkot-587 104

Mala Patil
Asst. Prof. of Computer Science, Dept. of SAS.
College of Horticulture, Bagalkot-587 104

मराठी अनुवाद: पियुष कोवे

Source :Return to farming Embracing integration and technology, Leisa, Marcha, 2024